# राशिभविष्य - मार्च, २०१२.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================================

**(१) मेष -** या राशीच्या शासकीय, निमशासकीय नोकरीत असणाऱ्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. काहींना बढती, अधिकारपद मिळण्याची शक्यता दिसते या राशीच्या ज्या मंडळींना नोकरीत अगदी सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र मनस्ताप व दु:ख देणाऱ्या घटनांमुळे अस्वस्थ व्हाल. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने चिकित्सक बौद्धिक, शास्त्रीय संशोधनात्मक व कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना, तसेच वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल. प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापार, व्यवसाय करत असणारांना मात्र आर्थिक बाबतीत विलंब, घोटाळे, नुकसान, फ़सवणूक यांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. महिन्याच्या अखेरच्या चार दिवसांत मात्र थोडा आर्थिक दिलासा मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळामुळे मुलांपैकी कोणाचे गैर आचरण, कोणाचे अनारोग्य, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांमुळे त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात गुरु-मंगळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल आहेत. त्यामुळे गैरसमज, वितुष्ट, असमाधानकारक घटना, भांडणतंटे, राहत्या जागेसंबंधीचा त्रास किंवा स्थावरसंबंधी वाद अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण शुक्राच्या अल्पशा अनुकुलतेमुळे परिस्थिती सुसह्य होईलसे दिसते. तसेच ज्यांना अध्यात्म साधनेत रस आहे व जे उपास्य दैवताची उपासना करत आहेत त्यांना वरील प्रतिकुलता सहन करणे शक्य होईल. केतुमुळे वाहनधोका आहे. जपा. महिन्याचे अखेरचे चार दिवस खूपच सुखदायक होतीलसे दिसते. दिनांक १२-१३ या दोन दिवशी मानसिक त्रास होणे संभवते. . पण इतर दिवशी शासकीय, निम शासकीय नोकरदार मंडळींना, वकिली, अकौण्टन्सी व अन्य चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना, मानसिक रोग तज्द्न्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतरांच्या व्यापार-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे शक्य आहे. जपा. पण बुधाच्या अनुकुलतेने थोडा धनलाभ व अल्पसे सुखसमाधान लाभेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या कोणतीही नोकरी वा व्यापार-व्यवसाय करत असणारांना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून चिकित्सक बौद्धिक संशोधनात्मक व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रगतिकारक, विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना परधर्मीय ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या महिन्याच्या पूर्वार्धात मात्र मनस्ताप, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध अशा प्रकारच्या घटना सहन कराव्या लागतीलसे दिसते. पण अध्यात्माची आवड असून उपासना चालू असेल तर उपासनेत प्रगती होईल सूचक स्वप्ने पडतील. तसेच

या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाचे योगही येतील. गुरु-शुक्र या दोन्ही शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने विवाहेच्छूंचे विवाह होतील, इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत अपेक्षित यश मिळेल. या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. मंगळाच्या अनुकुलतेमुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल व प्रवासाचे योग येतील. पण प्रवासात इजा होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुख मिळणे शक्य दिसत नाही. या राशीच्या मंडळींचा स्वभाव या महिन्याच्या काळात अत्यंत लहरी होणार असल्यानेच हातून विचित्र आचरण घडेलसे दिसते. जपा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. रवि-मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे व सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत गेल्यामुळे शारीरिक
उष्णता भडकून उष्णतेचे विकार निर्माण होतील. डोळ्याचे दुखणे, तसेच मान, दाढा, घसा यांचे आजार होण्याची शक्यता दिसते. आर्थिक गरजा भागवण्यासाठी काहींना खूप कष्ट करावे लागतील. त्यामुळेही अनारोग्य होईल. काही मंडळींना अनपेक्षित खर्चाला तोंड द्यावे लागेल. येणे वसूल होणे कठिण पण देणे मात्र द्यावेच लागेल. त्यामुळे काही मंडळी चिंतित होतील. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय, शैक्षणिक व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. मात्र अन्य व्यवसाय असणारांना अडचणी, अडथळे यांना तोंड द्यावे लागेल. मुलांचे आजार वा अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येण्याची शक्यता आहे. या राशीच्या ज्या मंडळींचा दलाली वा कमिशनवर व्यवसाय असेल त्यांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनिमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे शक्य आहे. तसेच स्थावर संपत्तीबाबत वाद होणे संभवते. जपा. महिन्याचे अखेरचे चार दिवस दिलासा देणारे असतील.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्वच मंडळींचा मूळ स्वभाव तापट, अधिकारशाही चालवणारा, मानापमान फ़ार असणारा असा असतो. या महिन्यात त्यात मंगळाच्या गुणधर्मांची भर पडली आहे. मनासारखे घडावे यासाठी खूप दगदग, कष्ट सहन करावे लागतील. या मनस्ताप व शारीरिक कष्टामुळेच शारीरिक, मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. जपा. नोकरीतही सतत मनाविरुद्ध घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण शनिच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र किंवा मनासारखी उत्तम नोकरी मिळू शकेल. पण एखाद्या भावंडासंबंधी चिंता निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, विरोध आदिमुळे गृहसौख्यात बाधा येईल. जपा. नेपच्यूनमुळे दांपत्यजीवनात संकटे येण्याची शक्यता आहे. मन शांत ठेवा, वाद टाळा व समजूतदारपणे आचरण करा, तरच फ़ारसा त्रास होणार नाही. अशा परिस्थितीत काहींना ताप येणे, अपचन होणे, पोटाचे विकार बळावणे अशापैकी आजाराला तोंड द्यावे लागेलसे दिसते. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. अपघातभय आहे. जपा. अशा प्रतिकुल काळात शुभ ग्रह गुरु-शुक्राची तसेच बुधाची उत्तम साथ मिळेल व मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. नोकरी-व्यवसायात महिन्याच्या अखेरचे चार दिवस अधिकच मनस्ताप देणारे असेच सिद्ध होतील जपा.

**(६) कन्या -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकुल होईल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंतांना अचानक धनलाभ संभवतो. काहींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होईल. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्य, दांपत्यजीवनात कटकटी निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भागीदारी व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारांत गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्यावी. या राशीच्या मंडळींना सध्या मंगळ ग्रह अति प्रतिकुल आहे. त्यामुळे अनपेक्षित खर्च, चिंता, जुन्या प्रकरणांचा त्रास, गैरसमज, भांडणे यांमुळे त्रस्त व्हाल. साडेसातीचा काळ आहे ही बाब ध्यानात घेऊन मनावर संयम ठेवा, सहनशील बना; तरच होणारा मनस्ताप सुसह्य होईल. शनिमुळे आर्थिक चिंता, कुटुंबात भांडणे, अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे कर्तृत्व सिद्ध होईल; पण बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळींना उगीचच आजारपणाची भावना होईल. तसेच काल्पनिक चिंतांनी काहीजण त्रस्त होतील. श्रद्धा असेल तर हनुमानाची उपासना अनुकुल होईल. हनुमानचालीसा स्तोत्राचे श्रद्धेने पठण करा.

**(७) तुळा -** या महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींना कौटुंबिक कलह, अनारोग्य, कुटुंबातील दुरावा नोकरीत प्रतिकुल परिस्थिती, कामाचा ताण अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अशा परिस्थितीत जिद्द करू नका, सहनशील व्हा व मनावर संयम ठेवून विनम्रतेने आचरण करा. त्यामुळे होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती थोडी सुधारेल. निदान नोकरीत तरी अनुकुल परिस्थिती राहील. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. अध्यात्मात विशेष रस असणारांना अध्यात्मिक उपासनेत सात्विक सुखसंतोष लाभेल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. स्नेहसंबंधात वाढ होईल. महिन्याचे अखेरचे चार दिवस तर विविध

प्रकारचे लाभ देणारे असेच सिद्ध होतील. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतूमुळे या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार, मुख-दंत रोग अशापैकी आजारांना सामोरे जावे लागेलसे दिसते. मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट येईल. जपा. पण या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** बौद्धिक संशोधन, शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळींना प्रगतीच्या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल आहे. पण रवि-शुक्र प्रतिकुल असल्यामुळे आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. तसेच कौटुंबिक सुख व गृहसौख्य या बाबतीतही बाधा येणे शक्य आहे. पण गुरुच्या अनुकुलतेमुळे अनारोग्य हद्दीबाहेर जाणार नाही. दांपत्यजीवनातही गैरसमजामुळे वा अनारोग्यामुळे बाधा येणे संभवते. या राशीच्या मंडळींना आरोग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे मनस्ताप, मुदतीचे ताप, मेंदूचे विकार अशापैकी आजारांना तोंड द्यावे लागेल. व्यावसायिकांनाही खळबळजनक घटनांना तोंड द्यावे लागेल. या राशीच्या युवकांना काही तरी नवीन करण्याची इच्छा निर्माण होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण जाणवेल. पण यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या मंडळींनी

साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन सर्व व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करावेत. नपेक्षा फ़सवणूक, आर्थिक चिंता अशापैकी संमस्यांनी त्रस्त व्हाल. काहींना कोर्ट कचेरीला सामोरे जावे लागेल. मुलांचे आजार, गैरआचरण अशापैकी कारणांनी संततिसुखातही बाधा येणे संभवते. मनाला उभारी यावी यासाठी श्रद्धेने हनुमानाची उपासना व शिवोपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना त्यांच्या जन्मकुंडलीतील योगानुसार बढती, उच्च पद, मानाचे स्थान अशापैकी लाभ होणे संभवते. वकिली, अकौण्टन्सी, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षणक्षेत्र अशापैकी नोकरी-व्यवसाय असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. असे असले तरी महिन्याच्या अखेरच्या चार दिवसांत मात्र या राशीच्या सर्वांनाच मनस्तापदायक घटनांना सामोरे जावे लागेल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण प्रवासात त्रास, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक त्रास, भांडणे, मनाविरुद्ध घटना, खर्च वाढ अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. काहींना राहत्या जागेचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. पण या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख मात्र मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. श्रीगुरुदत्तात्रेयाची उपासना मन:शांती देऊ शकेल.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक कष्ट होण्याची शक्यता आहे. तसेच शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. डोळ्याचे आजार, मूळव्याध अशापैकी आजार संभवतात. तसेच अपघातातून हाडमोड होणे संभवते. त्यामुळे गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना जन्मकुंडलीतील योगानुसार विविध प्रकारचे लाभ होतील. उच्च चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळींना काळ प्रगतिकारक व यशदायी होईल. कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभेल. या राशीच्या बागायत शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. तसेच स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होणेही संभवते. पण नातेवाईक मंडळींकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते.या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे येण्याची शक्यता आहे. जपा. वीज व पाणी यांपासून धोका संभवतो. जपा. लोखंड,कोळसा, खाण उद्योग अशापैकी व्यापार-व्यवसाय

असणारांना काळ लाभदायक होईल. पण इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या ज्या मंडळींना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह टाळावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन या महिन्याच्या काळात अतिशय कोमल असणार असून मनावर होणारा थोडासाही आघात अस्वस्थ करील गहरे नैराश्य येईल. शारीरिक-मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. हृदयविकार, रक्तदाब असे विकार असणारांनी मन सतत शांत व संयमित राखण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक वाद, आप्तेष्ट भांडणे यांमुळे शारीरिक उष्णता भडकून डोळ्याची दुखणी निर्माण होतील. जपा. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. फ़सवणूक होण्याची शक्यता दिसते. शक्यतो कोणाची आर्थिक जबाबदारी स्वीकारू नका. मंगळामुळे जीवनसाथीचे अनारोग्य, पतिपत्नीत होणारे वाद, मतभेद यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी भागीदारीत मतभेदाची परिस्थिती वा संशयाचे वातावरण निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. या राशीच्या मंडळींचे कोणत्याही प्रकारचे लिखाण ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल होईल. भावंडाकडून त्रास होणे संभवते. शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काहींना मानसन्मान प्राप्त होण्याची शक्यता आहे. नोकरी-व्यवसायास काळ अनुकुल होईल व दूरच्या प्रवासाचे योग येतील.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या सर्वच मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा असे दिसते. कोणीही उपदेश केलेला किंवा समजूत काढण्याचा प्रयत्न केला तरी ते आवडत नाही. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड, व्रात्य झाली असणे संभवते. अशा परिस्थितीत रवि-बुध हे दोन ग्रहही प्रतिकुल असून शारीरिक-मानसिक आरोग्यविघातक असल्याचाच अनुभव येईल. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे गहरे नैराश्य येणे संभवते. पण गुरुच्या राशीतील हर्षल शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु-शुक्रामुळे व्यापार-व्यवसायात वाढ होणे, अर्थप्राप्तीत वाढ होणे, कुटुंबात शुभ घटना घडणे अशा प्रकारचे अनुभव येतील. या राशीच्या मंडळींनी अध्यात्म उपासनेत लक्ष घातले तर मन शांत, स्थिर व स्वस्थ राहण्यास मदत होईल. महिन्याच्या अखेरच्या चार दिवसांत या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काहींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ वा मान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होईलसे दिसते. पण मंगळामुळे शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे अशापैकी आजार उत्पन्न होतीलसे दिसते. तसेच अपप्रचाराचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. जपा. त्याचप्रमाणे चोरी, फ़सवणूक अशामुळे आर्थिक नुकसान होणेही शक्य आहे जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर मन अतिशय शांत राखण्याचा प्रयत्न करावा. काल्पनिक चिंता करू नयेत. शनि-राहूमुळे अपेक्षाभंग होईल. जपा.

\- ----ooooo-----